कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता गट-क संवर्गातील कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व नेमणूका करणेबाबत.
विनंती बदली २०२५

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.बांध/आस्था-२/२४६/२०२५
अहिल्यानगर दिनांक २६/०५/२०२५

वाचा :-
१. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.-११२ /आस्था- १४ दिनांक १५/०५/२०१४
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रं.जिपब-४१४/ प्र.क्रं.११२/ आस्था-१४, दिनांक ०२/०७/२०१४
३. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/ प्र.क्र.१३६/आस्था-१४ दिनांक ०२/०१/२०१७
४. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन पुरकपत्र क्र.जिपब-४८१७/ प्र.क्र.२२८/ आस्था- १४ दिनांक ०७/०३/२०१९
५. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन पुरकपत्र क्र.जिपब-४८१७/ प्र.क्र.२२८/ आस्था- १४ दिनांक २८/०३/२०२५
६. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दिनांक १५/०५/२०२५

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, संदर्भ क्रमांक २ ते५ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तद्अनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, जिल्हा परिषदे अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता गट-क या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावा समोरील रकाना क्रमांक ४ येथून रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | सध्याचे कार्यरत ठिकाण | बदलीने द्यावयाचे ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.अश्विन पंडीत वाघ | कनिष्ठ अभियंता | जि.प.ल.पा.उपविभाग कोपरगांव | जि.प.सा.बां.उपविभाग अकोले | विनंती |
| २ | श्री.संदिप रमेश निकम | कनिष्ठ अभियंता | जि.प.सा.बां.उपविभाग संगमनेर | जि.प.सा.बां.उपविभाग कोपरगांव | विनंती |
| ३ | श्री.अनिल जयसिंग सानप | शाखा अभियंता | जि.प.सा.बां.उपविभाग पाथर्डी | जि.प.सा.बां.उपविभाग शेवगांव | विनंती |
| ४ | श्री.किरण गुलाबराव साळवे | सहाय्यक अभियंता | जि.प.सा.बां.उपविभाग राहूरी | जि.प.सा.बां.उत्तर विभाग अहिल्यानगर | विनंती |

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी या आदेशाच्या दिनांकापासुन कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. संदर्भ क्र.१ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र.७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन आदेशाच्या दिनांकानंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

तसेच बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. सदर बदली विनंतीने झाली असल्याने संबंधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०५२६९३००३२ असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रति,

संबंधीत कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता
द्वारा संबंधीत कार्यालय प्रमुखांमार्फत

प्रत - माहिती व कार्यवाहीस्तव सादर

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहिल्यानगर
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहिल्यानगर
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.अहिल्यानगर
४. कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बां.उत्तर विभाग/ दक्षिण विभाग अहिल्यानगर
५. उप अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग अकोले/कोपरगांव/शेवगांव
६. संबंधीत कार्यालय प्रमुख

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन या आदेशाच्या दिनांकानंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहिल्यानगर